कोळसेवाडी वाहतूक उपविभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना


महाराष्ट्र पोलीस

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ २७० /२०२४ दि. २२/१०/२०२४

## –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

ज्याअर्थी, कल्याण डोंबिवली महानगरपालिका कार्यक्षेत्रातील कोळसेवाडी वाहतूक उपविभागाचे हद्दीत विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ चे अनुषंगाने विविध राजकीय पक्षांचे नामनिर्देशन पत्र दाखल करणे व उमेदवारी अर्ज मागे घेण्याची प्रकीया दिनांक २२/१०/२०२४ ते दिनांक ०४/११/२०२४ रोजी पावेतो मा. निवडणूक निर्णय अधिकारी १४२ – कल्याण पुर्व विधानसभा मतदारसंघ यांचे कार्यालय क.डों.म.न.पा. ड प्रभाग क्षेत्र जुना पुना लिंक रोड, कल्याण पुर्व येथे पार पडणार आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) चक्कीनाका येथुन जुना पुना लिंक रोडने ''ड'' प्रभाग क्षेत्र काटेमानिवली मार्गे विठ्ठलवाडी उल्हासनगरकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या तिसगांवनाका येथे 'प्रवेश बंद' करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने तिसगांवनाका येथुन डाविकडुन वळुन म्हसोबा चौक कोळसेवाडी मार्केट मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) उल्हासनगर, विठ्ठलवाडी कडुन चक्कीनाका दिशेने येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना काटेमानिवली ब्रिज चढणीला येथे 'प्रवेश बंद' करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने काटेमानिवली ब्रिजखालुन डावीकडे वळून चिंचपाडा रोड मोर्गे मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ३) चक्कीनाका चौक येथुन जुना पुना लिंक रोडने ''ड'' प्रभाग क्षेत्राकडे जाणाऱ्या जड अवजड वाहनांना चक्कीनाका येथे 'प्रवेश बंद' करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची जड अवजड वाहने चक्कीनाका येथुन मलंग रोड व नेतिवली चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ४) आनंद दिघे/स्मशानभुमी चौक येथुन काटेमानिवली ''ड'' प्रभागक्षेत्राकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड अवजड वाहनांना आनंद दिघे/स्मशानभुमी चौक येथे 'प्रवेश बंद' करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची जड अवजड वाहने आनंद दिघे/स्मशानभुमी चौक येथून आनंद दिघे ब्रिज व श्रीराम चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदर अधिसूचना दिनांक २२/१०/२०२४ ते दिनांक ०४/११/२०२४ रोजी पावेतो सकाळी १०:०० ते सायंकाळी १८:०० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सिजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( पंकज शिरसाट )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

CamScanner

**प्रत माहितीसाठी सविनय सादर**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर

मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर

मा. जिल्हाधिकारी, ठाणे

मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.

मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ—३, कल्याण, विशेष शाखा, ठाणे.

प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे, कल्याण

परिवहन व्यवस्थापक, कल्याण—डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे/कल्याण

नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर

__प्रत__ :— पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर

२/—सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

__प्रत__ :— समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे.

२/— सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

__प्रत__ :— स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग,/पोनि कोळशेवाडी, कल्याण, डोंबिवली वाहतूक उपविभाग, ठाणे शहर.

२/— म.न.पा.कल्याण—डोंबिवली च्या संबंधीत अधिका—यांकडून आवश्यक सूचना फलके लावून घ्यावीत.

CamScanner